लोकमत

# शिवाजी विद्यापीठ करणार तमिळ विद्यापीठासोबत सामंजस्य करार

## छत्रपती शिवराय-व्यंकोजीराजे यांच्या नात्यांवर नवा प्रकाश पडणार; कोल्हापूर-तंजावर संबंध आणखी दृढ होणार

संदीप आडनाईक ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** छत्रपती शिवाजी महाराजांचे सावत्र बंधू व्यंकोजीराजे भोसले यांच्यामुळे कर्नाटक आणि तमिळनाडू राज्यांत जतन झालेल्या मराठी संस्कृतीचा अहद् तंजावर, तहद् पेशावरचा इतिहास उजेडात येण्याची शक्यता आता निर्माण झाली आहे. या संदर्भात शिवाजी विद्यापीठ आणि तमिळ विद्यापीठामध्ये एप्रिलमध्ये सामंजस्य करार होणार आहे. त्यामुळे इतिहास संशोधकांना दोन्ही प्रदेशांबरोबरच त्यांच्या सावत्र नात्यावरही आणखी प्रकाश पडणार असून,

**अहद् तंजावर, तहद् पेशावर | भाग १**

संशोधनाचे नवे द्वार उघडणार आहे.

चार वर्षांपूर्वी राज्य मराठी संस्कृती मंडळाच्या अनुदानातून तंजावरच्या ऐतिहासिक दस्तऐवजाच्या जतनीकरणाचा प्रकल्प सुरु झाला. या प्रकल्पावर कोल्हापूरचे मोडीतज्ज्ञ गणेश नेर्लेकर-देसाई यांच्यासह महाराष्ट्रातील काही मान्यवर काम करीत होते. यावेळी मंडळामार्फत सात लाख दुर्मीळ मोडी कागदपत्रांचे डिजिटायजेशन करण्यात आले. यानिमित्ताने तमिळ विद्यापीठासोबत सामंजस्य करार करता येईल, असा विचार सुरु झाला. त्याला तमिळ विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठाने अनुकूलता दर्शविली. त्याला ऑगस्ट २०१९ मध्ये मूर्त स्वरुप प्राप्त झाले.

> छत्रपतींचे घराणे म्हणून तंजावरचे भोसले घराणे ओळखले जाते; तेथील ऐतिहासिक व मोडी कागदपत्रांचे जतन त्या घराण्याने केले आहे, याची फार थोड्यांना माहिती आहे. तेथील माहिती घेण्यासाठी शिवाजी विद्यापीठाची एक समिती तंजावरला पाठविली. डॉ. अवनीश पाटील यांच्या नेतृत्वाखाली या समितीने अभ्यास करुन तंजावर व कोल्हापूरचे संबंध आणखी दृढ होतील अशी कागदपत्रे तपासली आहेत. त्यातून हा सामंजस्य करार अस्तित्वात येत आहे. यानिमित्ताने दोन राज्यांतील जुने संबंध पुन्हा जोडण्याचा प्रयत्न केला जात आहे.
>
> – डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ

यासाठी स्थापन केलेल्या समितीवर राज्य मराठी विकास मंडळाचे प्रभारी संचालक प्रा. आनंद काटीकर, सहायक संचालक डॉ. अशोक सोलणकर, तज्ज्ञ समिती सदस्य गणेश नेर्लेकर-देसाई, इतिहास संशोधक पांडुरंग बलकवडे, डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या पुरातत्त्व विभागाचे प्रा. डॉ. गिरीश मांडके, मुंबईचे मोडीतज्ज्ञ श्रीकृष्णाजी म्हात्रे यांची निवड करण्यात आली होती.

सामंजस्य करारासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीमध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. अवनीश पाटील, गणेश नेर्लेकर, डॉ. नीलांबरी जगताप, तंजावरचे तमिळ विद्यापीठाचे कुलगुरू सी. बालसुब्रह्मण्यम, डॉ. विवेकानंद गोपाळ यांचा समावेश आहे.

लोकमत


# गरजाधिष्ठित ई-कंटेंट निर्मितीची गरज : शिर्के

## शिवाजी विद्यापीठात 'ई-कंटेंट'वर कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांच्या अध्ययन पद्धतीमध्ये काळानुसार बदल होत आहेत. त्याला तांत्रिक ज्ञानाची जोड देऊन गरजाधिष्ठित ई-कंटेंट निर्मिती करणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी शनिवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्र व बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र यांच्या वतीने 'ई-कंटेंट डेव्हलपमेंट' या विषयावर आयोजित कार्यशाळेत ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. डॉ. शिर्के म्हणाले, बदलत्या जागतिक परिस्थितीनुसार आयटीसीचा वापर करून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण अभ्याससाहित्य देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. दूरशिक्षण केंद्राच्या प्रत्येक अभ्यासक्रमावर आधारित ई-कंटेंट होणे गरजेचे आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्राव्यतिरिक्त आपण ज्ञान देण्याचे काम करू शकतो. कार्यक्रमास खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, पुणे येथील शैक्षणिक माध्यम, विकसन, संशोधन केंद्राचे तांत्रिक तज्ज्ञ श्रीकांत ठकार, विनोद कल्गी, डॉ. प्रकाश पवार, ए. एम. गुरव, श्रीकृष्ण महाजन, डी. बी. सुतार, ई-कंटेंट समन्वयक एस. व्ही. थोरात उपस्थित होते. दूरशिक्षण केंद्राचे संचालक डॉ. एम. ए. अनुसे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एन. जे. बनसोडे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. माधुरी गुरव यांनी सूत्रसंचालन, आर. यू. संकपाळ यांनी आभार मानले.




डॉ. ए. डी. शिंदे शिक्षणशास्त्र महाविद्यालयात पदवी वितरण करताना पी. डी. राऊत, ॲड. श्रीपतराव शिंदे, शोभा काळेबाग यांच्यासह अन्य.

# काम करताना समाजात प्रतिमा नेहमी आदर्श ठेवा

## पी. डी. राऊत

**नेसरी / वार्ताहर :**

शिक्षक म्हणून काम करताना आजची स्थिती चिंताजनक जरी असली, तरी भविष्यात चांगले दिवस येणार आहेत. याचबरोबर शिक्षक म्हणून काम करताना आपली समाजात प्रतिमा नेहमी आदर्श ठेवावी, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे पर्यावरण विभागप्रमुख पी. डी. राऊत यांनी केले.

येथील दिनकरराव के. शिंदे शिक्षणशास्त्र महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष ॲड. श्रीपतराव शिंदे होते.

पी. डी. राऊत म्हणाले, ज्ञानाचा साठा भरपूर आहे; पण विद्यार्थ्यांना खरे ज्ञान देणे गरजेचे आहे, असे सांगून बी. एड. प्रशिक्षणातील कौशल्ये उच्च शिक्षण घेताना कशी महत्त्वाची ठरतात. शिक्षकावर असणाऱ्या विद्यार्थ्यांचा विश्वास कसा असतो तसेच पर्यावरणाविषयी शिक्षक या नात्याने आपण जागरुक राहिले पाहिजे, विद्यार्थ्यांना, समाजाला जागरुक केले पाहिजे, असे विचार व्यक्त केले. ॲड. श्रीपतराव शिंदे यांनी, शिक्षणाचा हेतू जाणून घेणे व प्रशिक्षणार्थींच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करणे हे शिक्षक या नात्याने महत्त्वाचे ठरते, असे स्पष्ट केले. प्राचार्य डॉ. एस. एम. रायकर यांनी प्रास्ताविक केले. संस्थेचा व महाविद्यालयामधील शैक्षणिक उपक्रमांचा आढावा घेतला.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते बी. एड. पदवी प्राप्त करणाऱ्यांना पदवी प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी डॉ. शोभा काळेबाग यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक उपस्थित होते. उज्ज्वला कोकाटे, स्नेहा करडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. टी. वाय. पटेल यांनी आभार मानले.

लोकमत

# 'अभियांत्रिकी'च्या परीक्षा ६ मे पासून

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील अभियांत्रिकी महाविद्यालयांतील परीक्षा दि. ६ मे आणि ७ मेपासून, तर पुनर्परीक्षार्थींच्या परीक्षा दि. २५ एप्रिलपासून सुरु होणार आहेत. विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने या परीक्षांच्या वेळापत्रकामध्ये बदल केला आहे.

अभियांत्रिकी महाविद्यालयांतील पुनर्परीक्षार्थींची परीक्षा २० एप्रिल, तर नियमित विद्यार्थ्यांच्या परीक्षा दि. २ मे पासून सुरु होणार होत्या. मात्र, या परीक्षा लोकसभा निवडणुकीच्या दरम्यान येत असल्याने, विद्यापीठाने दरवर्षीपेक्षा यंदा लवकर परीक्षा घेण्याचे नियोजन केल्याने विद्यार्थ्यांना त्याचा त्रास होणार होता. त्यावर युवा सेना, स्वाभिमानी विद्यार्थी संघटना यांनी या परीक्षांच्या वेळापत्रकात बदल करण्याची मागणी विद्यापीठ प्रशासनाकडे केली होती. त्याची दखल घेऊन परीक्षा मंडळाने वेळापत्रकामध्ये बदल केला आहे. या परीक्षा पुढे ढकलल्या आहेत. नव्या वेळापत्रकानुसार नियमित विद्यार्थ्यांची परीक्षा दि. ६ मे आणि ७ मे पासून, तर पुनर्परीक्षार्थींची परीक्षा २५ एप्रिलपासून सुरु होईल.

Kolhapur Main
Page No. 7 Apr 01, 2019
Powered by: erelego.com

# आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी खेळाडूंनी सज्ज व्हावे

कोल्हापूर टाइम्स टीम

'विद्यापीठाच्या 'कलर्स' विजेत्या क्रीडापटूंनी राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांत यश मिळवून आपले कौशल्य सिद्ध केले आहे. त्यांनी आता आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वतःचे कौशल्य दर्शविण्यासाठी सिद्ध व्हावे,' असे आवाहन आंतरराष्ट्रीय नेमबाज व ठाण्याच्या वनाधिकारी गिरीजा संदीप पाटील-देसाई यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागातर्फे सन २०१७-१८ मध्ये अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेत प्राविण्य मिळविलेल्या खेळाडूंचा गुणगौरव समारंभ (कलर्स-२०१७) मानव्यशास्त्र सभागृहात झाला. यावेळी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. आंतरविद्यापीठ स्पर्धेत सर्वाधिक गुण संपादन केल्याबद्दल न्यू कॉलेजला सर्वोत्कृष्ट महाविद्यालय म्हणून क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. कॉलेजने तिसऱ्यांदा हा बहुमान पटकाविला. प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांच्यासह खेळाडूंनी गौरव स्वीकारला.

आंतरविद्यापीठ स्पर्धेत वैयक्तिक व सांघिक प्रकारांत पाच सुवर्ण, पाच रौप्य व तेरा कांस्य अशी एकूण २३ पदके मिळविणाऱ्या आणि २१व्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव-२०१७मध्ये सहा सुवर्ण, आठ रौप्य व सात कांस्य अशी एकूण २१ पदके प्राप्त

## गिरीजा पाटील-देसाई यांचे आवाहन

करणाऱ्या क्रीडापटूंचा गिरीजा पाटील-देसाई यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

शिवछत्रपती पुरस्कार विजेता अक्षय देशमुख (तलवारबाजी), खेलो इंडिया स्पर्धेत सुवर्णपदक विजेती अश्विनी मळगे (वेटलिफ्टिंग), सुवर्ण विजेता ओंकार हंचनाळे (खो-खो), कांस्य विजेती मयुरी देवरे (वेटलिफ्टिंग), आयर्नमन स्पर्धेत महाराष्ट्राकडून जलद वेळ नोंदवून फ्रान्स येथील स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या सुप्रिया निंबाळकर यांचा गौरव करण्यात आला.

1 APR 2019

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होण्याचे लक्ष्य ठेवावे : गिरीजा पाटील

प्रतिनिधी
कोल्हापूर

विद्यापीठाच्या 'कलर्स' विजेत्या खेळाडूंनी राष्ट्रीय पातळीवरील विविध स्पर्धांमध्ये यश मिळवून आपलेही नाव रोशन केले. आपले यश हे केवळ राष्ट्रीय पातळीपुरतेच मर्यादीत न ठेवता आंतरराष्ट्रीय स्पर्धेतही स्थान मिळवून त्यामध्ये कसे यश मिळेल याचा खेळाडूंनी सातत्याने विचार करावा. तसेच त्यादृष्टीने तयारीलाही सुरुवात करावी. जो तयारी करेल, त्याला आंतरराष्ट्रीय स्पर्धेत निदान सहभागी होण्याची तरी संधी मिळाल्याशिवाय राहणार नाही, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय नेमबाज व पुणे येथील वनअधिकारी गिरीजा संदीप पाटील-देसाई यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागातर्फे सन २०१७-१८ मध्ये अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेत सहभागी होऊन यश मिळविलेल्या खेळाडूंच्या सत्कार समारंभ (कलर्स-२०१७) त्या बोलत होत्या. विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात समारंभ झाला. अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे होते.

यावेळी अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत विशेष प्रावीण्यासह सर्वाधिक गुण मिळविल्याबद्दल कोल्हापुरातील न्यू कॉलेजला २०१७-१८ या वर्षातील खेळांमधील सर्वोत्कृष्ट कॉलेज म्हणून क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर चषक देऊन गौरविले. यानिमित्ताने नागेशकर चषक पटकाविण्याची न्यू कॉलेजची हॅट्ट्रीक झाली आहे. कॉलेजच्या वतीने प्राचार्य डॉ. वी. एम. पाटील यांच्यासह खेळाडूंनी चषक स्वीकारला.

**शिवाजी विद्यापीठ येथे यशस्वी क्रीडापटूंचा गौरव समारंभ उत्साहात**

गिरीजा पाटील-देसाई म्हणाल्या, आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये चमकण्यासाठी जागतिक स्तरावरील क्रीडाक्षेत्रातील प्रवाह काय आहेत, याची खेळाडूंनी माहिती करुन घ्यावी. तसेच आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करुन त्यादृष्टीने सरावाला लागावे. आपल्या मार्गदर्शकांबरोबरच जागतिक पातळीवरील प्रशिक्षकांकडून सराव कसा करावा याचे मार्गदर्शन घ्यावे. तसेच रोजच्या सरावाचे योग्य नियोजन करुन स्पर्धेत यश मिळविण्याची जिद्द मनामध्ये बिंबवावी. असे केल्यास यश आपल्याकडे आपोआप धावत येईल. या यशामुळेच क्रीडापटूंसाठी राज्य तसेच केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमध्ये पाच टक्के राखीव जागांचा खेळाडूला फायदा होईल.



कोल्हापूर : विद्यापीठ पातळीवरील विविध क्रीडा स्पर्धांमध्ये यश मिळविलेल्या खेळाडूंचा आंतरराष्ट्रीय नेमबाज गिरीजा पाटील-देसाई यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, डॉ. डी. आर. मोरे, डॉ. पी. टी. गायकवाड, संभाजी पाटील, डॉ. बाबासाहेब उलपे आदी उपस्थित होते.

कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, खेळाडूंनी जिद्दीने यश मिळवत विद्यापीठाचा लौकिक देशभरात निर्माण केला आहे. केवळ पारंपरिक खेळातच नव्हे, तर रग्बी, ग्रीको-रोमन कुस्ती, फेन्सिंग अशा अवघड खेळातही यश मिळविण्याची धमक खेळाडूंनी दाखवून दिली आहे. खेळाडूंना सराव व स्पर्धेदरम्यान विमा संरक्षण योजना देण्याबरोबरच आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी जाणाऱ्या खेळाडूंना तब्बल दोन लाख रुपयांचा निधी विद्यापीठाकडून दिला जात आहे. हा लाभ खेळाडूंपर्यंत पोहोचविण्याचे काम शारीरिक शिक्षण संचालकांनी करावे, असे आवाहन डॉ. शिंदे यांनी यावेळी केले.

यावेळी सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात झालेल्या आंतरविद्यापीठ स्पर्धेत वैयक्तिक व सांघिक प्रकारात पाच सुवर्ण, पाच रौप्य व तेरा कांस्य पदके आणि २१ व्या महाराष्ट्र आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव-२०१७ मध्ये पाच सुवर्ण, आठ रौप्य व सात कांस्य पदके मिळविलेल्या खेळाडूंचा गिरीजा पाटील-देसाई यांच्या हस्ते ब्लेझर, स्मृतिचिन्ह, पुस्तक व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी शिवछत्रपती पुरस्कार विजेता अक्षय [illegible] (तलवारबाजी), खेलो इंडिया स्पर्धेत सुवर्ण पदक विजेती अश्विनी [illegible] (वेटलिफ्टिंग), सुवर्ण पदक विजेता [illegible] (खो-खो), कांस्य पदक विजेती [illegible] (वेटलिफ्टिंग) यांचाही विशेष गौरव करण्यात आला. तसेच कोलंबो (श्रीलंका) येथे झालेल्या आर्चरीमध्ये स्पर्धेत यश मिळवून [illegible] स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या विवेकानंद महाविद्यालयाच्या सुप्रिया [illegible] यांचाही विशेष गौरव करण्यात आला. यावेळी विद्यापीठाचे वैद्यकीय सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, [illegible] पुरस्कार विजेते संभाजी पाटील यांच्यासह शारीरिक शिक्षण संचालक, खेळाडू उपस्थित होते. डॉ. पी. टी. गायकवाड यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.

1 APR 2019
Times of India
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# E-Content workshop conducted at SUK to showcase its importance

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** An e-content workshop was conducted at the campus of the Shivaji University, Kolhapur (SUK) recently. According to the officials from the varsity, this workshop was jointly organized by the centre for distance education and the Barrister Balasaheb Khardekar knowledge centre of the university.

D T Shirke, pro-VC (Vice-Chancellor), Shivaji University Kolhapur said in his speech during the program, "With the changing times of today, we should endeavour to use more and more of Information and Communication Technology (ICT). The content for this should be of a qualitative manner rather than quantitative. There should be e-content available for every course of the varsity that is out there for the distance education. This e-content is going to help us make distance education a part of the mainstream."

According to Shirke, the video-based e-content will help the distance education students more in the learning process.

CAMPUS BUZZ



Kirloskar-Toyota COO Kenichiro Kambe at DKTE's 'Josh 2019'

**Innoviz at KIT College:** The Kolhapur Institute of Technology (KIT), in association with Shivaji University Kolhapur, had organized an 'Innoviz' event earlier in the month of March, read a press statement from the college. It added that various projects were exhibited by the students of the college in the event. Around 90 students of the institute participated in the event, it added.

**Kirloskar -Toyota COO visits DKTE:** Kenichiro Kambe, COO (Chief Operating Officer) of Kirloskar-Toyota, visited the Ichalkaranji-based DKTE Society's Textile and Engineering Institute earlier last month for its annual gathering event called 'Josh-2019', read a press statement from the college.

The statement added that, Kambe in his speech said, "With various innovative techniques and the availability of more than ample resources, the signing of memorandum of understandings (MoUs) are helping students create better opportunities for themselves."

He said that in the future, the Toyota loom should be started at Ichalkaranji, which will help in the expansion of business.

**Business meet conducted at SUK:** A business meet called 'Udyam Samagam' was conducted at the Shivaji University, Kolhapur recently. The meet was organized by the department of technology of the university, in association with the Ministry of Micro, Small and Medium Enterprises (MSMEs) of the central government.